प्रेसनोट दिनांक १२/०६/२०२४

# घरफोडीचा ०१ व चोरीचे ०५ असे ०६ गुन्हे, शहर गुन्हे शाखेकडून उघड

---

अ) दिनांक १०/०६/२०२४ रोजी, गुन्हे शाखेकडील, सपोनि/जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकास, गोपनिय बातमी मिळाली की, एक इसम कमी किंमतीत टि. व्ही. विक्री करण्यासाठी, सलगर वस्ती परिसरातील चर्च जवळ येणार आहे. त्याअनुषंगाने, सपोनि/जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकाने, **आरोपी नामे- अनमोल आनंद जाधव, वय-२७ वर्षे, राहणार- सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.०२ सोलापूर** यास ताब्यात घेतले. त्यानंतर, त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये, त्याने त्याचा मित्र पाहिजे आरोपी नामे- सचिन शिंदे याच्यासह एक टि.व्ही. आणि गणपतीची मुर्ती चोरी केल्याची कबुली दिली. त्याप्रमाणे, आरोपी नामे- अनमोल आनंद जाधव याचे ताब्यातुन, टि.व्ही व गणपतीची मुर्ती असा एकुण **५६,२९०/-** रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यानुसार, **सलगर वस्ती पोलीस ठाणे गु.र.नं. ११४/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये, दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.**

ब) **तसेच,** दिनांक ०९/०६/२०२४ रोजी, गुन्हे शाखेकडील, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास, मिळालेल्या गोपनिय बातमीचे अनुषंगाने, **आरोपी नामे-साहेबा उर्फ सोनू सतीश चव्हाण, वय-४१ वर्षे, रा.लोधी गल्ली, सोलापूर** यास ताब्यात घेवून, त्याचेकडून, **PORSCHE कंपनीची २,५१,०००/- रूपये किंमतीची चोरी केलेली सायकल जप्त केली आहे.** त्यानुसार, **सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर कडील गु.र.नं.४३२/२०२४ भा.द.वि.क.३७९ अन्वये दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.** **त्याचप्रमाणे,** सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास मिळालेल्या गोपनिय बातमीचे अनुषंगाने, **आरोपी नामे- वावू श्यामलाल कुकरेजा,** वय-५५ वर्षे, रा.सोलापूर यास ताब्यात घेवून, त्याचेकडून, चोरीस गेलेली २०,०००/- रू. **किंमतीची एक इलेक्ट्रीक सायकल जप्त केली आहे.** त्यानुसार, **सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर कडील गु.र.नं.४२६/२०२४ भा.द.वि.क.३७९ अन्वये दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.**

क) **त्याचप्रमाणे,** दिनांक १२/०६/२०२४ रोजी, गुन्हे शाखेकडील, सपोनि/दादासो मोरे यांचे तपास पथकातील पोकॉ/इम्रान जमादार यांना, बातमी मिळाली की, " नंबर प्लेट नसलेली शाईन कंपनीची मोटार सायकल चोरी केलेला इसम हा, सदरची मोटार सायकल घेवून, विक्रीकरीता रेवणसिध्देश्वर मंदीर, जुना विजापूर नाका या ठिकाणी येणार आहे." प्राप्त बातमीचे आधारे, सपोनि/दादासो मोरे व त्यांचे तपास पथकाने, रेवणसिध्देश्वर मंदीर, जुना विजापूर नाका येथून, **आरोपी नामे- रावजी विरप्पा माने, वय-४६ वर्षे, रा.घर नं-१०३१, न्यु पाच्छा पेठ, यलगंटी कॉम्प्लेक्स, अशोक चौक, सोलापूर** यास ताब्यात घेतले. नमूद आरोपीकडे अधिक विचारपूस करता त्याने, होंडा कंपनीची शाईन मॉडेलची **मोटार सायकल क्रमांक एम.एच.१३ सी.डी.८९३४ किंमत २५,०००/-ही** चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार, **सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.४३१/२०२४ भा.दं.वि.क.३७९ अन्वये, दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.**

ड)**तसेच,** स.पो.नि./संदिप पाटील व त्यांचे तपास पथकास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, विजापूर नाका पो.स्टे. गुरनं-९१/२०२४ भादंवि-३८० या गुन्ह्यातील चोरीस गेलेला मोबाईल महिला नामे- रेणुका जाधव ही वापरत आहे. त्यानुसार, **महिला नामे- रेणुका सुरेश राठोड, वय-३५ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा. ब्लॉक नं-४०, मंत्री चंडक, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर** हिला ताब्यात घेवून, तिचे कब्जातुन, **विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर शहर गुरनं-९१/२०२४ भादंवि-३८० मधील पांढऱ्या रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमत रू.२५,०००/- हा जप्त करून, सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.**

**तसेच,** दिनांक ०९/०६/२०२४ रोजी, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे पथकास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जेलरोड पो.स्टे. गुरनं-१२८४/२०२० भादंवि-३७९ या गुन्ह्यातील

Scanned with CamScanner

चोरीस गेलेला मोबाईल रेकॉर्डवरील आरोपी नामे- विराज कांबळे हा वापरत आहे. त्यानुसार, **आरोपी नामे- विराज हुसेनी कांबळे, वय-२५ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. १३६, कडबा बाजार जवळ, रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर** याचेकडे मोबाईल बाबत विचारपूस केली असता, त्याने सदरचा मोबाईल मार्केट यार्ड मधील एका वाहनातुन चोरी केल्याचे कबुल केले. त्याप्रमाणे **जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर गुरनं-१२८४/२०२० भादंवि-३७९ मधील काळ्या रंगाचा रेडमी कंपनीचा मोबाईल किंमत रू.१५,०००/- हा जप्त करणेत आला आहे.**

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेने घरफोडी चोरीसह चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणून, एकूण ०३,९२,२९०/- रूपयेचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदरची कामगिरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, श्री.अजित बोऱ्हाडे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/विजय पाटील, सपोनि/जीवन निरगुडे, सपोनी/दादासो मोरे, सपोनि/संदीप पाटील व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner